963

जिल्हा परिषदांना प्रशासकीय इमारती बांधण्यासाठी जिल्हा ग्रामीण विकास निधीतून कर्ज मंजूर होण्यासंबंधी होत असलेल्या मागण्यांबाबत.

---

महाराष्ट्र शासन
ग्राम विकास व जलसंधारण विभाग
शासन आदेश क्रमांक व्हीपीएम-२६९५/प्र.क्र.४७/४२
मंत्रालय, मुंबई- ४०००३२ दिनांक ३ मे १९९५

## आ दे श

मुंबई ग्रामपंचायत अधिनियम १९५८ चे कलम, १३३ व त्याखाली तयार करण्यात आलेले मुंबई जिल्हा ग्राम विकास निधी नियम, १९६० मधील तरतुदीनुसार, पंचायतीनी दिलेल्या ५ टक्के अंशदानातून प्रत्येक जिल्ह्यात " जिल्हा ग्राम विकास निधी " स्थापन करण्यात आलेला आहे. सदर निधीचा उपयोग हा पंचायतींना उक्त अधिनियमातील कलम ४५(१) च्या अनुसूचीत "एक" मधील विहीत केलेले कर्तव्य पार पाडण्याच्यादृष्टीने, पंचायतींना कर्ज देण्यासाठी केला जातो. सदर निधी हा जिल्हा परिषदेच्या स्थायी समितीकडे निहीत असतो.

२) सदर निधी हा जरी जिल्हा परिषदेच्या स्थायी समितीकडे निहीत झाला असला, तरी तो त्या जिल्हा परिषदेच्या कार्यक्षेत्रात येणा-या ग्रामपंचायतींच्या मालकीचा असतो, म्हणजेच, तो एक प्रकारे गंगाजळी स्वरूपाचा असतो. ज्या प्रयोजनासाठी सदर निधी स्थापन करण्यात आलेला आहे त्याच प्रयोजनासाठी स्थायी समितीने त्या निधीचा वापर करणे आवश्यक आहे. सदर निधीचा जिल्हा परिषद स्थायी समितीला अन्य प्रयोजनासाठी वापर करता येणार नाही. सदर निधीचा अन्य प्रयोजनासाठी उपयोग केल्यास, तो नियमबाह्य ठरेल.

३) जिल्हा ग्रामीण विकास निधीतील ग्राम पंचायतींनी कर्जाद्वारे वापरला न जाऊ शकणारा शिल्लक निधी, राज्यातील काही जिल्हा परिषदांकडून जिल्हा परिषदेच्या प्रशासकीय इमारतींच्या बांधकामासाठी जिल्हा परिषदांना त्या निधीतून कर्ज मंजूर करण्या-संबंधीचे प्रस्ताव जिल्हा परिषदेच्या स्थायी समितीच्या शिफारशीस शासनास प्राप्त झालेले आहेत. जिल्हा ग्रामीण विकास निधीतून जिल्हा परिषदांच्या प्रशासकीय इमारतीच्या बांधकामासाठी वा अन्य इतर प्रयोजनासाठी सुद्धा जिल्हा परिषदांना कर्जाऊ देण्यासंबंधीची कोणतीही तरतूद नियमात नाही, व अशी तरतूद नियमांत करणे देखील संयुक्तीक नाही. या संबंधीचा आवश्यक तो प्रस्ताव शासनास सादर केला असता जिल्हा ग्रामीण विकास निधीतून जिल्हा परिषदेच्या प्रशासकीय इमारतीच्या बांधकामासाठी जिल्हा परिषदांना कर्ज मंजूर करता येणार नाही. असा निर्णय शासन स्तरावर घेण्यात आला.

४) जिल्हा परिषदांच्या प्रशासकीय इमारतीच्या बांधकामासाठी योजनेंतर्गत कर्ज देण्याची योजना सन १९७६-७७ पासून शासनाने सुरू केली आहे. या संदर्भात, शासनाचे शासन

२/- - - पर

Scanned with OKEN Scanner

निर्णय क्र.ग्रावि.वि.क्र.स्तोडी१०८९/सीआर३४८८/२६, दि. २६ मे १९८९ अन्वयेने आदेश जिल्हा परिषदेच्या निदर्शनास आणून दिलेले आहेत. जिल्हा परिषदांना प्रशासकीय इमारतीच्या बांधकामासाठी कर्ज मंजूर करण्याच्यादृष्टीने "६५१५- इतर ग्राम विकास कार्यक्रमासाठी कर्ज-१००-पंचायत राज-४८ कर्ज-प्रशासकीय इमारती बांधण्यासाठी जिल्हा परिषदांना कर्ज-पंचायत राज संस्था(६५-१००६५)" या लेखाशिर्षाखाली शासनाकडून दर वर्षी तरतूद करण्यात येते, व ही मंजूर तरतूद जिल्हा परिषदेच्या मागणीप्रमाणे जिल्हा परिषदांना देण्यात येते.

५) हे विचारांत घेऊन, शासन जिल्हा परिषदांच्या मुख्य कार्यकारी अधिकारी यांना असे आदेश देत आहे की, जिल्हा ग्रामीण विकास निधीतील रकमेचा उपयोग जास्तीत जास्त ग्रामपंचायतीच्या निकडीच्या प्रयोजनासाठी उदा.(शाळा खोल्या, प्राणी पुरवठा [illegible]) कसा प्रकारे करता येईल यादृष्टीने जिल्हा परिषदांनी विशेष प्रयत्न करावे. व त्यानुसार, ग्रामपंचायतींना त्यांची विशेष कर्तव्य पार पाडण्याच्यादृष्टीने, सदर निधीतून कर्ज देण्यासाठी ग्रामपंचायतींना उद्युक्त करावे. सदर निधी हा ग्रामपंचायतींना त्यांची उक्त अधिनियमाच्या कलम ४५(१) ची अनुसूची(एक) मधील, कर्तव्ये पार पाडण्यासाठी कर्ज देण्याच्या प्रयोजनासाठी स्थापन केला असल्याने, सदर निधीचा उपयोग हा जास्तीत जास्त त्याच प्रयोजनासाठी जिल्हा परिषदेच्या स्थायी समितीने करणेआवश्यक आहे. सदर निधीतून जिल्हा परिषदांना जिल्हा परिषदेच्या प्रशासकीय इमारतीच्या बांधकामासाठी वा अन्य इतर प्रयोजनासाठी कर्ज देण्या-संबंधीची कोणतीही तरतूद नसल्याने या निधीमधून स्थायी समितीला कर्ज मंजूर करता येणार नाही. जिल्हा परिषदांच्या प्रशासकीय इमारतींच्या बांधकामासाठी कर्ज मिळण्यासंबंधी त्यांनी त्यांची मागणी विभागाकडे नोंदवून अर्थसंकल्पात तरतूद मंजूर करून घ्यावी व इमारतीचे बांधकाम पूर्ण करावे. अशा प्रकारची नियमबाह्य कर्जे जिल्हा परिषद प्रशासकीय इमारतीसाठी जिल्हा परिषदेच्या स्थायी समितीने मंजूर केली असल्यास, त्या रकमेची वसुली करण्याच्या दृष्टीकोनातून जिल्हा परिषदेने आवश्यक ती कार्यवाही करावी.

६) हे आदेश पूर्वलक्षी प्रभावाने लागू आहेत जिल्हा ग्रामीण विकास निधीमधून जिल्हा परिषद प्रशासकीय इमारतीसाठी कर्ज घेण्यास शासनाने यापूर्वी जिल्हा परिषदांना मंजूरी दिली असल्यास त्या प्रस्तावानांही हे आदेश लागू होतील त्या कर्जाचीही वसुली जिल्हा परिषदेने करावी.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांचे आदेशानुसार व नावाने.

सही/- x x x
( अ. कृ. जगताप )
कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन

---

जा.क्र.ग्रापं ६/आरआर/ ८८४ /९५
जि.प. जळगांव दि. २५-८-९५

प्रति
सर्व गट विकास अधिकारी (सर्व)
यांना माहितीसाठी व योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना.

उपमुख्य कार्यकारी अधिकारी(ग्रापं),
जिल्हा परिषद, जळगांव.

संजय/-

आहेत. जिल्हा परिषदांना प्रशासकीय इमारतीच्या बांधकामासाठी कर्ज मंजूर करण्याच्या दृष्टिने,"६५१५- इतर ग्राम विकास कार्यक्रमासाठी कर्ज-१००- पंचायत राज-४८ कर्ज-प्रशासकीय इमारती बांधण्यासाठी जिल्हा परिषदांना कर्ज-पंचायत राज संस्था[६५-१००६५]" या लेखाशिर्षाखाली शासनाकडून सदर वर्षी तरतूद करण्यांत येते व ही मंजूर तरतूद जिल्हा परिषदेच्या मागणीप्रमाणे जिल्हा परिषदांना देण्यांत येते.

५. हे विचारांत घेऊन, शासन जिल्हा परिषदांच्या मुख्य कार्यकारी अधिकारी यांना असे आदेश देत आहे की, जिल्हा ग्रामीण विकास निधीतील रकमेचा उपयोग जास्तीत जास्त ग्राम पंचायतींच्या निकडीच्या प्रयोजनासाठी उदा. [शाळा खोल्या, पाणी पुरवठा इ.] कशा प्रकारे करता येईल या दृष्टिने जिल्हा परिषदांनी विशेष प्रयत्न करावे. व त्यानुसार, ग्रामपंचायतींना त्यांची विशेष कर्तव्य पार पाडण्याच्या दृष्टिने, सदर निधीतून कर्ज घेण्यासाठी ग्राम पंचायतींना उद्युक्त करावे. सदर निधी हा ग्राम पंचायतींना त्यांची उक्त अधिनियमाच्या कलम. ४५[१] ची अनुसूची[एक] मधील, कर्तव्ये पार पाडण्यासाठी कर्जे देण्याच्या प्रयोजनासाठी स्थापन केला असल्याने, सदर निधीचा उपयोग हा जास्तीत जास्त त्याच प्रयोजनासाठी जिल्हा परिषदेच्या स्थायी समितीने करणे आवश्यक आहे. सदर निधीतून जिल्हा परिषदांना जिल्हा परिषदेच्या प्रशासकीय इमारतीच्या बांधकामासाठी वा अन्य इतर प्रयोजनासाठी कर्जे देण्यासंबंधीची कोणतीही तरतूद नसल्याने या निधीमधून स्थायी समितीला कर्जे मंजूर करता येणार नाही. जिल्हा परिषदांच्या प्रशासकीय इमारतींच्या बांधकामासाठी कर्ज मिळण्यासंबंधी त्यांनी त्यांची मागणी विभागाकडे नोंदवून अर्थसंकल्पात तरतूद मंजूर करून घ्यावी व इमारतीचे बांधकाम पूर्ण करावे. अशा प्रकारची नियमबाह्य कर्जे जिल्हा परिषद प्रशासकीय इमारतीसाठी जिल्हा परिषदेच्या स्थायी समितीने मंजूर केली असल्यास, त्या रक्कमेची वसुली करण्याच्या दृष्टिकोनातून जिल्हा परिषदेने आवश्यक ती कार्यवाही करावी.

६. हे आदेश पूर्वलक्षी प्रभावाने लागू आहेत जिल्हा ग्रामीण विकास निधीमधून जिल्हा परिषद प्रशासकीय इमारतीसाठी कर्ज घेण्यांत शासनाने यापूर्वी जिल्हा परिषदांना मंजूरी दिली असल्यास त्या प्रस्तावानाही हे आदेश लागू होतील. त्या कर्जांचीही वसुली जिल्हापरिषदेने करावी.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

अ.कृ.जगताप
३१/७/९१

[ अ. कृ. जगताप ]
कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन.

प्रत,

१] सर्व विभागीय आयुक्त,
२] सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी
३] निवड नस्ती, कार्यासन क्रमांक २२, ग्राम विकास व जलसंधारण विभाग

Stencil

Scanned with OKEN Scanner